पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
कारंजा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
ई-मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in
प्रेस नोट

दिनांक :- २५/११/२०२१

**पोलीस अधिक्षक वाशिम यांनी दिनांक २५ नोव्हेंबर आंतरराष्ट्रीय महिला अत्याचार निर्मुलन दिनाचे औचित्य साधुन वाशिम जिल्हयातील महिला हिंसाचार रोखण्याकरीता वर्षभरात केलेल्या कामगिरीचा घेतला आढावा.**

संयुक्त राष्ट्रमहासंघाच्या महासभेत घोषित केल्यानंतर दिनांक २५/११/२०२१ हा दिवस संपूर्ण जगभरात **"आंतरराष्ट्रीय महिला अत्याचार निर्मूलन दिन"** म्हणुन साजरा करण्यात येतो. महिलांवरील हिंसाचार म्हणजे मानवी हक्काचे उल्लंघन आहे. महिलावरील अत्याचार रोखण्यासाठी भारत सरकारच्या अनेक उपाय योजना देशभरात अमलात आणल्या जात आहेत. देशातील प्रत्येक राज्यात पिडित महिलांसाठी वेगवेगळया माध्यमातुन मदत केंद्रांची स्थापना करण्यात येते.

आज दिनाक २५/११/२१ रोजी आयोजित गुन्हे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीत मा.बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांचे मार्गदर्शनात,अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे,उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे , प्रभारी पोलीस उप अधिक्षक गृह तथा पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा, सोमनाथ जाधव,जिल्हा विशेष शाखा प्रभारी खंडेराव, महिला तक्रार निवारण कक्ष प्रभारी मपोउपनि,निर्भया पथक प्रभारी मपोउपनि धोंगडे व इतर अधिकारी उपस्थित होते. मा. बच्चन सिंह पोलीस अधिक्षक वाशिम यांनी गुन्हे आढावा बैठकी दरम्यान **आंतरराष्ट्रीय महिला अत्याचार निर्मूलन दिन"** या दिवशी वाशिम जिल्हयातील महिला हिंसाचार रोखण्याकरीता केलेल्या उपाययोजनाचा आढावा घेतला.

**वाशिम जिल्हयात महिलांच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या उपाययोजना**

**१)महिला तकार निवारण कक्ष :-** जिल्हा स्तर व पोलीस स्टेशन स्तरावर महिला तकार निवारण कक्ष स्थापीत करण्यातआले असुन त्यांचे मार्फत महिलांचे प्राप्त तकारीचे अनुषंगाने त्यांना समुपदेशन करून त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येते. सन २०२१ अदयापपावेतो एकुण २५९ तकार अर्ज प्राप्त झाले असुन समुपेदशनाच्या माध्यमातुन एकुण ५४ तकार अर्जाची निर्गती करण्यात आली तर ६६ अर्ज पोलीस ठाणे येथे पाठविण्यात आले वाशिम जिल्हयातील वेगवेगळया पोलीस ठाणे येथे कलम ४९८ भादवी अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. १३९ अर्जावर समुपदेशनाची प्रकिया सुरु आहे.

**२)निर्भया पथक :-** वाशिम जिल्हयात मुली व महिलांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथक कार्यान्वीत आहे. हरविलेल्या /बेपत्ता मुले, मुली व महिला यांचे शोध कामी जिल्हयातील प्रत्येक पोलीस स्टेशन मिळुन एकुण १३ पथके कार्यान्वित असुन एकुण ८ महिला अधिकारी ७१ महिला अंमलदार निर्भया पथकात कार्यान्वीत असुन त्यांचेकडुन शाळा, कॉलेज अशा ठिकाणी भेटी देवुन प्रबोधन करण्यात येते. तसेच छिडीमार करणारे रोड रोमिओ यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. निर्भया पथकाने आतापर्यत एकुण २४ तक्रारीचे निवारण केले आहे.

**३)हेल्प लाईन:-** कमांक १०९१ व १०० कमांक ११२ मुली व महिलांना आवश्यक त्या वेळी मदत मिळावी याकरीता नियंत्रण कक्ष वाशिम हेल्प लाईन कार्यान्वीत असुन त्याद्वारे मुले,मुली,महिलांच्या प्राप्त तकारी नोंदविण्यात येवुन त्यांना वेळीच मदत करून निवारण करण्यात येते. वाशिम जिल्हयात दिनांक १६ सप्टेंबर ते अदयापपावेतो ४६६ कॉल प्राप्त झाले असुन त्यापैकी ११० कॉल महिलां संबंधी असुन वेळोवेळी नमुद तकारींचे निवारण करुन अवघ्या २४ मिनिट ०४ सेकंद या कालावधीत महिलांना मदत उपलब्ध करुन दिली.

**४)सायबर सेफ वुमन :-** सायबर विभाग वाशिम यांचे मार्फत मुली,महिलांनी सोशल मिडीयाचा वापर कसा करावा,मुले,मुली व महिला संबंधी सायबरचे गुन्हे कसे घडतात अशा गुन्हयापासुन आपला बचाव कसा करावा

पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड,सिव्हील लाईन,वाशिम, ता जि वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

प्रेस नोट

याबाबत जनजागृती करण्याकरीता शाळा,कॉलेज इत्यादी ठिकाणी जावुन वेळोवेळी कार्यशाळेचे आयोजन करुन मुले,मुली,महिला यांना सायबर सुरक्षितेबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

५) **जलद गती न्यायालय** :– महिलावर झालेल्या अत्याचाराला तात्काळ न्याय मिळावा याकरीता प्रत्येक जिल्हयात जलद गती न्यायालयाची स्थापना करण्यात येते. जेणे करुन महिला अत्याचाराचे गुन्हयाचे निकाल जलद गतीने लावुन महिलाना न्याय मिळवुन देण्यास मदत होते. वाशिम जिल्हयात मागील ६ महिन्यात बलात्काराच्या १ गुन्हयात ७ वर्षे दंडाची शिक्षा तसेच इतर ३ गुन्हयात १ वर्षे दंडाची शिक्षा अशा एकुण ४ गुन्हयात मा. न्यायालयाने गुन्हयातील आरोपींना सुनावली आहे.

मा.बच्चन सिंह पोलीस अधिक्षक यांनी वाशिम मधील महिलांसाठी सुरक्षित वातावरण सुनिश्चित करण्यासाठी आम्ही सर्व उपक्रम राबवत आहोत असे आश्वासन देऊन, वाशिम मधील अडचणित असलेल्या महिलांना भयभित न होता हेल्पलाईन क्र १००,११२ तसेच नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रमांक ०७२५२–२३४८३४ यांना फोन द्वारे किंवा व्हॉटसअप ८६०५८७८२५४, ई मेल,टिव्टर द्वारे तक्रार करावी तक्रार करणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल असे सांगितले आहे.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम